ePaper

# लष्करी कारवाईचा दाखला देत पंतप्रधानांकडून काँग्रेस लक्ष्य!




वर्ष - 7 । अंक - 322 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## आतील पानांत


- मुंबईनं केली आरसीबीची धुळधाण
- आमिरने साजरी केली ईद
- केजरीवालांचे वजन घटले नाही
- शशिकांत शिंदे यांचा कणखर बाणा



www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 11 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## संजोग वाघेरे- श्रीरंग बारणे यांचा धडाक्यात प्रचार

# मावळची लढत ही तूर्तास दुरंगीच!

## पुण्याप्रमाणे वंचित बहुजन आघाडीने अद्याप उमेदवार दिलेला नाही

। पिंपरी । महाईन्यूज

**'मावळ'मध्ये आघाडी आणि युतीचे उमेदवार जाहीर झाल्याने ते जोरात प्रचार करू लागले आहेत. मात्र, घाटावर व घाटाखाली अशा खूप मोठ्या मतदारसंघात प्रचार करताना त्यांचा घाम निघत आहे. दरम्यान, गुरुवारी आघाडीचे म्हणजे ठाकरे शिवसेनेचे उमेदवार संजोग वाघेरे यांनी रमजान ईदनिमित्त पिंपरी-चिंचवडमधील मुस्लिम समाजातील राजकीय नेत्यांच्या गाठीभेटी घेत प्रचार केला. तर, त्यासाठी युतीतील शिंदे शिवसेनेचे श्रीरंग बारणे हे मंगलमुर्तीवाड्यात गेले.**





संजोग वाघेरे यांनी नुकताच घाटाखाली तळोजा येथील मशिदीत जाऊन नुकताच आपला प्रचार केला. रमजाननिमित्त आयोजित दावतमध्ये ते सहभागी झाले होते. तर, आज त्यांनी घाटावर पिंपरी-चिंचवडमधील मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

त्यानिमित्त त्यांनी जेष्ठ नेते आझमभाई पानसरे तसेच माजी नगरसेविका निगार बारस्कर यांची भेट घेऊन त्यांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. पिंपळे गुरव येथील सृष्टी चौक, राजीव गांधीनगर आणि चिंचवड येथील मशिदीतही ते गेले.

### बारणेंनी घेतले मंगलमूर्तीचे आशीर्वाद

श्रीरंग बारणेंनीही आज घाटावर आणि पिंपरी-चिंचवडमध्येच प्रचार केला.त्यांनी चिंचवडगावातील ऐतिहासिक मंगलमूर्ती वाड्यात जाऊन मंगलमूर्तींचे प्रथम आशीर्वाद घेतले. नंतर चिंचवडगावातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेतल्या. यावेळी माझी उमेदवारी चतुर्थीला जाहीर झाली, ही मंगलमूर्तींचीच कृपा आहे, असे उद्गार खासदार बारणे यांनी यावेळी काढले. त्यानंतर ते चिंचवड- पिंपरी लिंक रोडवरील कालिका माता मंदिरात गेले. तळेगाव स्टेशन (ता.मावळ)येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र (दिंडोरी प्रणित) आयोजित श्री स्वामी समर्थ प्रकट दिन व पालखी सोहळ्यात ते सहभागी झाले. यावेळी त्यांनी स्वामींच्या पालखीला खांदा देत स्वामी सेवा केली.सायंकाळी त्यांनी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. आकुर्डी येथील शिवसेनेचे विभागप्रमुख फारुख शेख तसेच चिंचवड येथील अख्तर पिंजारी, अन्वर पिंजारी, तौहीद पिंजारी तसेच हमीदभाई मुलाणी, लतिफ मुलाणी यांच्या घरी ते गेले.

### लढत दुरंगी ?

**दरम्यान,मावळची लढत ही तूर्तास दुरंगीच दिसत आहे. कारण तेथे पुण्याप्रमाणे वंचित बहुजन आघाडीने अद्याप उमेदवार दिलेला नाही. त्यांना तेथे उमेदवारच न मिळाल्याने ते तेथे बहुजन समाज पार्टीला पाठिंबा देण्याची शक्यता आहे. तसा त्यांनी तो बारामतीत शरद पवार राष्ट्रवादीच्या सुप्रिया सुळे यांना दिला आहे.**

# पुरंदरचा पुढचा किल्लेदार विजय शिवतारेच!

## अजितदादांसमोरच मुख्यमंत्री शिंदेंचा शब्द

। पुणे । महाईन्यूज ।

काही झाले तरी लोकसभा निवडणूक लढवणार, अशी विजय शिवतारेंनी घेतलेली भूमिका महायुतीला तडा देणार होती. त्यांच्यामुळे राज्यभर बंड होण्याची शक्यता होती. मात्र विकासाचे राजकारण आणि नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवण्यासाठी आपल्याला एक-एक जागा महत्त्वाची असल्याचे लक्षात आले. तालुक्यातील त्यांनी केलेल्या सर्व मागण्या पूर्ण केल्या जातील. त्यांनी स्वतःसाठी काहीही मागितले नाही. शिवतारेंनी अजित पवारांविरोधात घेतलेली भूमिकेवरून यू टर्न घेतल्यानंतर पुरंदरसह राज्यात विविध चर्चांना ऊत येण्याची शक्यता होती. ती टाळण्यासाठी पुरंदरमध्ये येऊन संभाव्य चर्चा टाळण्यासाठी सभा घेण्याची गळ घातली होती. त्यानुसार गुरुवारी सासवड येथे महायुतीचा मेळावा पार पाडला. यावेळी शिवतारेंना अजित पवार विधानसभेचा शब्द देतील, अशी आशा पुरंदरवासियांना होती. मात्र तो शब्द अजित पवारांच्या उपस्थित मुख्यमंत्री शिंदेंनी दिला. शिंदे म्हणाले, विजय शिवतारे खरे शिवसैनिक आहेत. त्यांनी एकदा ठरवले की तर ते ती गोष्ट पूर्ण केल्याशिवाय राहत नाहीत.



### शिवतारेंनी उगारला होता बंडाचा झेंडा

**लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीकडून सुनेत्रा पवारांचे नाव निश्चित होताच माजी मंत्री विजय शिवतारेंनी बंडाचा झेंडा उभारला होता. उपमुख्यमंत्री अजित पवारांना ओपन चॅलेंज देऊन गत पराभवाचे उट्टं काढून बदला घेण्याची भाषा केली होती. शिवतारेंच्या आक्रमक भूमिका पाहता महायुतीतील नेत्यांच्या पायाखालची जमीन सरकल्याचे बोलले जात होते. मात्र वर्षा बंगल्यावर शिवतारेंची समजूत काढण्यात मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यश आहे. त्यानंतर शिवतारेंनी अजित पवारांविरोधात उपसलेली तलवार म्यान केली.**

# अजित आणि विजय एकत्र असल्याने बारामतीत महायुतीला 2 लाखा पेक्षा जास्त मताधिक्य!

## » मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला विश्वास

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**यंदाची लोकसभा निवडणूक वैयक्तिक नाही तर देशाच्या विकासाची आहे. सुनेत्रा ताईंना मत म्हणजे विकासाला मत. घडाळ्याला मत म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदींना दिलेल मत आहे. अन् आता अजित आणि विजय एकत्र असल्याने बारामती लोकसभा मतदारसंघात महायुतीला दोन लाखा पेक्षा जास्त मताधिक्य मिळेल, असा आशावाद व्यक्त करत "विकासाला देऊ गती आणि जिंकू आपली बारामती" असा नारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला.**



सासवड येथे आयोजित महायुतीच्या मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार व शिवसेना नेते विजय बापू शिवतारे उपस्थित होते.

पुढे बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, एकदा शब्द दिल्यानंतर शब्द फिरवण्याचे काम आपल्याकडे नसते. विजय बापू बाळासाहेबांच्या विचारांचा शिवसैनिक आहे. आपले सरकार बाळासाहेबांच्या विचाराचे, गोरगरिबांचे सरकार आहे. विकासाची गंगा या राज्यात आम्ही आणली. कोविडच्या नावाखाली सर्वकाही बंद होते, आपले सरकार आल्यानंतर सण - उत्सव साजरे झाले, आनंदी वातावरण तयार झाले आणि सरकारच्या कामाने कोविड देखील पळून गेला. कोविड आणि लॉक डाउन हा काही लोकांचा आवडीचा विषय होता, असे म्हणत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना टोला लगावला.

### हे काम करणारे सरकार आहे

अजित पवारांविषयी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, आजीतदादा थेट काम करतात गोलगोल फिरवत नाहीत, यामुळेच सात वेळा लोकांनी त्यांना निवडून दिले आहे. आम्ही फिल्डवर फिरून काम करणारी माणसे आहोत मंत्री, मुख्यमंत्री असलो तरी कार्यकर्त्या सारखे काम आम्ही करतो. एसी ऑफिसमध्ये बसून फक्त आदेश देत नाही. किंवा फेसाबूक लाईव्ह करत नाही. हे 24 तास काम करणारे सरकार आहे, दादा आले आता राज ठाकरे यांनीही मोदीजी वर विश्वास दाखवत विकासाला बिनशर्त पाठिंबा दिला आहे.

### कार्यकर्ता जपायचा असतो

» शिवतारे सर्वसामान्यांसाठी लढणार नेता आहे. पण जेव्हा त्यांनी महायुतीच्या विरोधातील भूमिका घेतली, तेव्हा त्यांच्याशी आम्ही संवाद साधला कारण एक एक कार्यकर्ता जपायचा असतो, तो घालवायचा नसतो. कारण प्रत्येक कार्यकर्ता महत्वाचा असतो, असे ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

# विमानतळाचा, पुरंदरच्या पाण्याचा प्रश्न तत्काळ सोडविणार!

## » समाविष्ट गावांना कर सवलत - उपमुख्यमंत्री अजित पवार

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**एखादे गांव महापालिकेत किंवा नगरपालिकेत समाविष्ट केल्यास कर एकदम वाढणार नाही यांची काळजी घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. आचारसंहिता शिथिल झाल्यानंतर जून महिन्यात पावसाळी अधिवेशन या संदर्भात विधेयक आणले जाणार आहे. यातून हवेली, पुरंदर, खडकवसला भागातील नागरिकांना टॅक्स मध्ये दिलासा देण्याचे काम केले जाईल, अशी खात्री उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिली.**





आगामी लोकसभा निवडणूक 2024 च्या पार्श्वभूमीवर सासवड येथे संवाद सभेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिवसेनेचे विजय बापू शिवतारे आदी उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले, एखादे गांव महापालिकेत किंवा नगरपालिकेत समाविष्ट केल्यास कर एकदम वाढतो. मात्र येथील कर एकदम न् वाढवता विकासाच्या तुलनेत टप्प्या टप्प्याने वाढवला जावा असा प्रस्ताव मांडण्यात येणार आहे. या निर्णयामुळे फुरसुंगी, उरूळी देवाची, खडकवासला आदी भागातील नागरिकांना फायदा होणार आहे.

पुरंदर भागातील विकास, रिंगरोड, पुरंदर विमानतळ आदींविषयी बोलताना अजित पवार म्हणाले, लोकांवर दमदाटी करून आम्हाला कोणताही विकास करायचा नाही. येथील विमानतळ ही काळाची गरज आहे. मात्र, शेतकऱ्यांची इच्छा आणि जनतेचा पाठिंबा असेल तरच हे विमानतळ उभे राहील. तसेच गुंजवणी धरण प्रकल्प उभारण्याचे काम वेल्हा, भोरकरांना कोणताही त्रास न देता आम्ही पूर्ण करू, असे आश्वासन देखील पवार यांनी दिले.

पुढे बोलताना उपमुख्यमंत्री म्हणाले, केवळ निधी मिळून उपयोग नाही पण त्याला राजकीय इच्छाशक्तीची देखील जोड पाहिजे, तरच विकास होवू शकेल. मागील 15 वर्षात जेवढा निधी तुमच्या विद्यमान खासदारांनी आणला असेल त्या पेक्षा जास्त निधी राष्ट्रवादी काँग्रेस, महायुतीचा उमेदवार आणेल याची खात्री मी देतो. पुरंदर तालुक्यातील आठ गावांमध्ये हे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रस्तावित करण्यात आले आहे.

सात वर्षापूर्वी 2017 मध्ये याची घोषणा करण्यात आली होती. यासाठी केंद्र सरकारच्या विमानतळ प्राधिकरणाच्या टीम ने पाहणी करून या जागेसाठी ग्रीन सिग्नल देखील दिला होता. मात्र हे विमानतळ उभारताना याच्या आजूबाजूला लॉजिस्टिक पार्क उभारण्यात यावे. यासाठी विमानतळाची पूर्वीची जागा थोडी पुढे घेऊन बारामती (Baramati) तालुक्यातील तीन गावांचा यात समावेश करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केंद्र सरकारकडे केली होती. त्याबाबतचा पत्रव्यवहार देखील पवार यांनी केंद्र सरकारच्या संबधित विभागाकडे केला आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळा बरोबरच लॉजिस्टिक पार्क उभारण्यासाठी आवश्यक असलेली जागा ताब्यात घेण्याचे मोठे आव्हान येथे आहे.

### फडणवीसांच्या भूमिकेला अजित दादांचा पाठिंबा

» नव्याने सुचविण्यात आलेल्या जागेवर विमानतळ करण्यास विमानतळ प्राधिकरणाने असहमती दाखविलेली आहे. यापूर्वी निश्चित केलेल्या जागेवरच आंतरराष्ट्रीय विमानतळ होईल असे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. या प्रकल्पासाठी जागा भूसंपादन करण्याची जबाबदारी आता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) यांच्यावर देण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून याच्या बैठका सध्या सुरू आहेत. शिंदे फडणवीस सरकारमध्ये सहभागी झालेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील आता उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या भूमिकेला पाठिंबा देत जुन्या ठिकाणीच विमानतळ व्हावे असे स्पष्ट केले आहे.

## महिला, लहान मुले आणि आबालवृद्धांना श्वसनाचा त्रास

# रावेतमध्ये आरएमसी प्लँटमुळे रहिवाशांचे आरोग्य धोक्यात!

### महापालिका आणि महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाला कधी येणार जाग

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**रावेतमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या मधोमध आरएमसी प्लँट असल्यामुळे रहिवाशांना श्वसनाचा त्रास होऊ लागला आहे. तसेच, ध्वनिप्रदूषण आणि हवाप्रदूषणाचे प्रमाण अतिशय वाढलेले आहे. महापालिकेने या आरएमसी प्लँटवर कारवाई करत तो इतरत्र ठिकाणी हलवण्यास सांगावा किंवा लवकरात लवकर बंद करावा असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.**



सध्या पिंपरी-चिंचवडमध्ये रावेत, वाकड, किवळे, पुनावळे आदी भागांमध्ये गगनचुंबी इमारतीचे जाळे पसरत चालले आहे. या गगनचुंबी इमारती बांधण्याकरिता मोठ्या प्रमाणात सिमेंट लागते. हे सिमेंट बनविण्यासाठी बिल्डर स्वतःचेच आरएमसी प्लँट उभा करतात जेणेकरून त्यांच्या गृहनिर्माण संस्थेला लागणारे सिमेंट त्यांच्याच आरएमसी प्लँटमधून उपलब्ध होईल अशी व्यवस्था करतात. असे आरएमसी प्लँट मुख्यत्वेकरून रहिवाशी भागात नसायला पाहिजेत पण आजच्या काळात समाजातील वृद्ध, लहान मुले, तरुण मुले-मुली, अपंग आणि दुर्बल लोकांच्या राहणीमानाची तमा न करता विकसक आणि ठेकेदार बिनधास्तपणे आरएमसी प्लँट रहिवाशी भागांत कार्यान्वित करतात असे पिंपरी-चिंचवड परिसरातील नागरिकांचे म्हणणे आहे.

रावेत हा पिंपरी-चिंचवड तीव्र गतीने विकसित होणारा भाग. ह्या भागात नामांकित विकसकांच्या इमारती, आयटीयन्स लोकांची राहण्यासाठीची पसंती, उत्तम दर्जाचे रस्ते, दुतर्फा झाडी, मुंबई -पुणे द्रुतगती मार्ग २ किलोमीटर अंतरावर आणि प्रसिद्ध शाळा, विद्यालये आहेत. तसेच, या ठिकाणी जवळजवळ 30 -40 हजार लोक अलीकडच्या काळात नोकरी व्यवसायानिमित्त वास्तव्यास आलेले आहेत. अशा ह्या गजबजलेल्या भागाच्या मधोमध आरएमसी प्लँट (संतोष ड्रीम्स गृहनिर्माण सोसायटी नजदीक) उभा असून ह्या आरएमसी प्लँटमुळे रावेत मधील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ह्या आरएमसी प्लँटमधून येणाऱ्या धुळीकणामुळे येथील रहिवाशांना श्वसनाचे आजार उद्भवू लागले आहेत. तसेच, ह्या परिसरातील हवेची गुणवत्ता ढासळली आहे.

### परिसरातील लोकं आंदोलन करण्याची शक्यता...

» रावेत परिसरातील रहिवाशांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाकडे हा आरएमसी प्रकल्प हटवावा म्हणून काही दिवसांपूर्वी तक्रार केली आहे. महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाने सदर आरएमसी प्लँटची पाहणी करून महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाला पुढील कार्यवाही करण्यास सांगितले आहे परंतू महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाने अजूनपर्यंत हा आरएमसी प्रकल्प बंद करण्यासाठी ठोस अशा उपाययोजना केल्या नाहीत असे नागरिकांचे म्हणणे आहे. सकाळी व्यायामाला जाणाऱ्या आबालवृद्धांना आणि येथील रहिवाशांना तोंडाला रुमाल बांधून चालावे लागतेय. जर हा आरएमसी प्रकल्प लवकरात लवकर बंद केला नाही तर ह्या परिसरातील लोक लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आंदोलन करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# मोशीत जलवाहिनीला गळती, हजारो लीटर पाणी वाया

## महापालिकेच्या सेक्टर 11, 13 स्पाईन रस्त्यावरील जलवाहिनी अचानक गळती

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरात अपुरा, कमी दाबाने पाणीपुरवठ्याच्या तक्रारींचा ओघ सुरु असतानाच महापालिकेच्या सेक्टर ११, १३ स्पाईन रस्त्यावरील जलवाहिनी अचानक गळती लागली. यामुळे हजारो लीटर पाणी वाया गेले. दुरुस्तीचे काम हाती घेतले असल्याने चऱ्होली, मोशी, डूडूळ गाव, बोऱ्हाडेवाडीसह या वाहिनीवरील पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला आहे. सायंकाळी पाणीपुरवठा होणार नसून शुक्रवारचा विस्कळीत राहणार आहे.**



### पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन

» या जलवाहिनीवरून होणारा चऱ्होली, मोशी, डूडूळ गाव, बोऱ्हाडे वाडी, चोवीसवाडी, वडमुखवाडी, देहू रस्ता,चक्रपाणी वसाहत, इंद्रायणी नगर, सर्व प्राधिकरण सेक्टर क्रमांक ४,६,९,११, १३ तसेच चक्रपाणी वसाहत, सद्गुरूनगर या सर्व भागाचा पाणी पुरवठा बंद करण्यात आला आहे. काम पूर्ण झाल्यानंतर पाणी पुरवठा चालू करण्यात येईल. या परिसराचा आजचा यापुढील पाणी पुरवठा बंद राहणार आहे. तसेच उद्याचा पाणीपुरवठा हा अनियमित, कमी वेळ, कमी दाबाने आणि विस्कळीत राहील असे पाणीपुरवठा विभागाने सांगितले. गळती लवकरात लवकर काढून पाणी पुरवठा पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन, कार्यकारी अभियंता रामनाथ टकले यांनी केले.


आंद्रा धरणातून मिळणाऱ्या पाण्यात घट झाल्याने शहरातील पाणीपुरवठा आठ दिवस विस्कळीत झाला होता. समाविष्ट गावांसह उपनगरांमध्ये भीषण टंचाई निर्माण झाली होती. बुधवारपासून पूर्वीप्रमाणे ८० दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी मिळण्यास सुरुवात झाली आहे. पण, पाणी टंचाईच्या तक्रारी कायम आहेत. त्यातच आता स्पाईन रस्त्यावरील जलवाहिनीला अचानक गळती लागली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी झाली. पाणीपुरवठा विभागाने जलवाहिनी दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. या कामास वेळ लागणार आहे. त्यामुळे जलवाहिनीवरील पाणी पुरवठा बंद करण्यात आला आहे.



## भूमिका

**सार्वत्रिक निवडणुकांद्वारे लोकशाहीचा महान सण साजरा करत असताना, आम्ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असल्याचा दावा करतो ज्यामध्ये ९७ कोटी मतदार मतदान करणार आहेत. इतक्या मोठ्या संख्येने मतदार असलेली लोकशाही सध्यातरी जगात नाही. तद्वतच, उमेदवारांनी त्यांच्या सुप्रसिद्ध विचारसरणीच्या आधारे निवडणूक लढवावी अशी आमची अपेक्षा आहे, परंतु ही निवडणूक खूप वेगळी आहे.**

# भारतीय मुस्लीम निवडणुकीतून हद्दपार का?



उमेदवारांमध्ये कोणतेही वैचारिक मतभेद नाहीत कारण नामांकनाच्या तारखेपर्यंत उमेदवार एका पक्षाचा असतो आणि दुसऱ्या पक्षाच्या वतीने नामांकन दाखल करतो, ते सुद्धा विरुद्ध विचारसरणी असलेल्या. माध्यमांमध्ये चर्चा उमेदवाराच्या शैक्षणिक किंवा सामाजिक पात्रतेबद्दल न होता केवळ जात आणि धर्मांमधील तुलनात्मक सामर्थ्याबद्दल होत आहे. लोकशाही आणि त्यातील निवडणुकांचे हे वेगळेच रूप आहे.लोकशाहीमध्ये समाजातील सर्व प्रवर्गांतील नागरिकांना प्रतिनिधित्वाची आणि शासनात सहभागाची अपेक्षा असते. जर लोकसंख्येतील एका गटाला प्रतिनिधित्व मिळाले नाही तर त्यांच्यात असंतोष वाढत जातो. धोरणनिश्चितीमध्ये परकेपणा असल्यास असा एक गट शासनापासून दुरावतो. अशाप्रकारे एका गटाला वंचित ठेवल्यामुळे लोकशाहीचा पराभवच होतो. या विवेचनाचे कारण, 'एनडीए' आणि 'इंडिया' आघाडीने बहुतांश उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. परंतु, दोघांकडूनही महाराष्ट्रात एकही मुस्लीम उमेदवाराला तिकीट देण्यात आलेले नाही. देशातही काही वेगळे चित्र नाही. १५ टक्के लोकसंख्या असलेल्या अल्पसंख्याक समुदायाला निवडणूक लढवण्याची संधीच नाकारली जात असल्याने त्यांना प्रतिनिधित्व मिळणार नाही, हे स्पष्ट आहे. आज देशात एकही मुस्लीम मुख्यमंत्री नाही. केंद्रीय मंत्रिमंडळात एकही मुस्लीम मंत्री नाही, १५ राज्यांतील मंत्रिमंडळात मुस्लिमांना प्रतिनिधित्व नाही. मुस्लिमांना प्रतिनिधित्व नाकारणारी काही राज्ये काँग्रेसशासितदेखील आहेत.भारतातील मोठ्या राजकीय पक्षांद्वारे निवडणूक प्रक्रियेत मुस्लिमांना प्रतिनिधित्व नाकारल्यामुळे हा अल्पसंख्याक समुदाय राजकीय परिदृश्यातून हळूहळू अदृश्य होत आहे. यापूर्वी, न्यायमूर्ती सच्चर समितीसह इतर समित्यांनी मुस्लिमांचे मागासवर्गीयपण दूर करण्यासाठी सकारात्मक पावले उचलण्यावर भर दिला, मात्र राजकीय पक्ष याबाबत ठोस भूमिका घेताना दिसत नाहीत. विधिमंडळ आणि इतर निवडून आलेल्या संस्थांमध्ये मुस्लिमांच्या प्रतिनिधित्वाचा मुद्दा आपल्या घटनेइतकाच जुना आहे. २४ मार्च १९४७ रोजी डॉ. आंबेडकरांनी अल्पसंख्याक समाजातील मंत्रिमंडळ सदस्याची निवड केवळ त्या समाजाच्या मतदारांद्वारेच करावी, असा प्रस्ताव सादर केला होता. त्याच वर्षी १७ एप्रिल रोजी एस. पी. मुखर्जी यांनी अल्पसंख्याकांसाठी कायदेमंडळे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाची मागणी करणारे निवेदन सादर केले. सरदार पटेल अल्पसंख्याकांच्या अधिकारांसाठी नेमण्यात आलेल्या समितीचे अध्यक्ष होते. २७ ऑगस्ट १९४७ रोजी या समितीने मुस्लिमांना त्यांच्या लोकसंख्येच्या आधारावर आरक्षण देण्याचा प्रस्ताव मांडला आणि संविधान सभेने हा प्रस्ताव मान्य करत आरक्षणाची तरतूद केली आणि मुस्लिमांसाठी आरक्षण संविधानाचा भाग झाला.१ मे १९४९ रोजी सरदार पटेल यांनी अल्पसंख्याक समितीचा अहवाल दिला आणि सांगितले, की मुस्लिमांना मुख्य प्रवाहाचा भाग व्हायचे असल्याने त्यांनी स्वेच्छेने आरक्षणाचा अधिकार सोडला आहे आणि त्यामुळे आरक्षणाची मागणी मागे घेण्यात आली आहे. संविधानसभेने एकदा अहवालाचा स्वीकार केल्यावर पुन्हा चर्चा झालेला हा एकमेव मुद्दा होता. चर्चेदरम्यान एच. व्ही. कामथ यांनी स्पष्टपणे विचारले, "तुम्ही मागणी का केली?" मौलाना आझाद यांच्या नेतृत्वाखाली भारतात राहण्याचा निर्णय घेतल्यानंतरही भविष्यात भारतीय मुस्लिमांना पाकिस्तानच्या निर्मितीचे ओझे वहावे लागेल हे आता निश्चित झाले होते. त्यावेळी सरदार पटेल उद्गारले, "जसे सुरू आहे तसे राहू द्या, आमच्यावर विश्वास ठेवा आणि काय घडते ते बघा", अर्थात त्यांच्या बोलण्याचा अर्थ आरक्षणाच्या अभावामुळे मुस्लीम प्रतिनिधित्व नाकारणे हा नव्हता.

## संपादकीय »

### अपवादांचा अपराध!

***गेल्या म्हणजे २०१९च्या विधानसभा निवडणुकीत कारिखो क्री हे अपक्ष उमेदवार अरुणाचल प्रदेशातील तेझु मतदारसंघातून ७५३८ इतक्या मतांनी विजयी झाले.***

गेल्या म्हणजे २०१९च्या विधानसभा निवडणुकीत कारिखो क्री हे अपक्ष उमेदवार अरुणाचल प्रदेशातील तेझु मतदारसंघातून ७५३८ इतक्या मतांनी विजयी झाले. त्यांनी भाजप आणि काँग्रेस या पक्षांच्या उमेदवारांचा पराभव केला. पण यातील एका पराभूत उमेदवाराने क्री यांच्या निवडीस आव्हान दिले. आसाम, नागालँड, मिझोराम आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांच्या उच्च न्यायालयासमोर त्याची सुनावणी झाली. क्री यांच्या निवडीस आव्हान देणाऱ्याचा आक्षेप होता त्यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रावर. निवडणुकीस अर्ज भरला की प्रत्येक उमेदवारास आपल्या तसेच पत्नीच्या स्थावर-जंगम मालमत्तेचा सविस्तर तपशील प्रतिज्ञापत्राद्वारे जाहीर करावा लागतो. यात मालमत्तेच्या बरोबरीने उमेदवाराने स्वत:वर दाखल विविध गुन्ह्यांचीही माहिती उघड करणे बंधनकारक असते.

हरितक्रांतीमुळे धान्योत्पादनात वाढ जरुर झाली, परंतु त्याचबरोबर अनेक समस्या निर्माण झाल्या. या समस्यांची दखल ना राज्यकर्त्यांनी घेतली, ना कृषी वैज्ञानिकांनी घेतली. परिणामी कालौघात कृषी समस्या उग्र झाल्या. उदाहरणार्थ, तांदुळ आणि गहू यांच्या अधिक उत्पादक वाणांसाठी रासायनिक खतांचा वाढता वापर अनिवार्य ठरला.

# हरितक्रांती खरंच कितपत उपयुक्त ठरली?



अशा खताांच्या उत्पादनासाठी खनिज द्रव्यांचा वापर होत असल्यामुळे १९७३ साली 'ओपेक' राष्ट्रांनी खनिज तेलाच्या किमती सुमारे चौपट केल्यावर स्वाभाविकपणे रासायनिक खतांच्या किमती गगनाला भिडल्या. अशा परिस्थितीत धान्यांच्या उत्पादन खर्चात वाढ होऊ नये आणि शेतकऱ्यांच्या नफ्यात घसरण होऊ नये या उदात्त हेतूने केंद्र सरकारने रासायनिक खतांच्या किमती कृत्रिमरित्या रोखून धरल्या. या प्रक्रियेचा आर्थिक भार केंद्र सरकारला उचलावा लागतो. त्यासाठी आजच्या घडीला वार्षिक सुमारे दोन लाख ५० हजार कोटी रुपयांचा भार केंद्र सरकारच्या तिजोरीवर पडतो.रासायनिक खतांच्या किमती कृत्रिमरित्या रोखून धरल्यामुळे युरिया या खताचा वापर औद्योगिक क्षेत्रातही होत असे. ही गळती थांबविण्यासाठी केंद्र सरकारने युरियाला कडुलिंबाचा लेप (COAT) देण्यास सुरुवात केली. या प्रक्रियेमुळे युरियाचा औद्योगिक क्षेत्रातील वापर बंद झाला. परंतु भारतात रासायनिक खतांच्या किमती केंद्र सरकारने कृत्रिमरित्या रोखून ठेवल्यामुळे अशी खते चोरट्या मार्गाने पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका अशा शेजारच्या देशांत निर्यात होऊ लागली. परिणामी अशा शेजारच्या देशांमधील शेतकऱ्यांना रासायनिक खते स्वस्तात मिळू लागली. हा अवैध व्यापार थांबविण्यास भारत सरकारला यश मिळाले नाही. 'आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय' अशी ही अवस्था आहे. हरितक्रांतीपूर्वी देशात मोठ्या प्रमाणावर ज्वारी, बाजरीसारखी लक्षणीय प्रमाणात कमी पाणी लागणारी पिके घेतली जात होती. परंतु हरिक्रांतीनंतर भात, गहू अशी अधिक पाणी लागणारी पिके घेण्यास सुरुवात झाली. पंजाब, हरियाणा अशा राज्यांत भाताच्या पिकाला पुरेसा पाऊस पडत नाही. तरीही तेथील शेतकरी भाताचे पीक घेतात आणि त्यासाठी भूगर्भातील पाण्याचा बेसुमार उपसा करतात. पाण्याचा असा उपसा करण्यासाठी राज्य सरकारे शेतकऱ्यांना जवळपास फुकटात विजेचा पुरवठा करतात. तसेच केंद्र सरकार शेतकऱ्यांनी पिकविलेला तांदूळ निर्यात करण्याचे काम करते. अशा रीतीने एक प्रकारे पाण्याची तर निर्यात होतेच, पण त्याचबरोबर भूगर्भातील पाण्याचा उपसा करण्यासाठी खर्च होणारा विद्युत पुरवठा, तांदुळाच्या उत्पादनासाठी लागणारी रासायनिक खते अशा उत्पादक घटकांवर होणाऱ्या सरकारच्या खर्चाचा भार अंतिमत: भारतातील कर भरणाऱ्या लोकांना वाहावा लागतो आणि त्याचा लाभ विदेशातील ग्राहकांना होतो. दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास येते. हरितक्रांतीमुळे ज्वारी, बाजरी, अशा पौष्टिक खाद्यान्नाऐवजी तांदूळ व गहू अशा जवळपास नि:सत्व धान्यांच्या पुरवठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शशिकांत शिंदे यांचा कणखर बाणा!

## निष्ठा बदलली नाही म्हणून होणाऱ्या परिणामांना भीत नाही

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबई बाजार समितीत चुकीचे काम झाल्याचे कारण पुढे करून जर कोणी दबावाचे राजकारण करीत असेल तर परिणामांना कधी घाबरलो नाही, खोट्या गुन्ह्यातून आवाज दाबण्याचा प्रयत्न झाल्यास सत्य कधी मरत नसते असा कणखर बाणा दाखवत, विरोधकांनी (खासदार उदयनराजे भोसले) अशा प्रकारे रडीचा डाव खेळू नये अशी अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सातारा लोकसभा मतदार संघाचे उमेदवार, आमदार शशिकांत शिंदे यांनी व्यक्त केली.**



माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या कराडमधील समाधीस्थळी नतमस्तक होवून शशिकांत शिंदे यांनी आपल्या प्रचारास प्रारंभ केला. खासदार श्रीनिवास पाटील, आमदार बाळासाहेब पाटील, ॲड. उदयसिंह पाटील – उंडाळकर, सारंग पाटील, दीपक पवार, आदी नेत्यांसह पदाधिकारी, कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. दरम्यान, शिंदे पत्रकारांशी बोलत होते. 'रामकृष्ण हरी, वाजली तुतारी' 'शरदचंद्र पवार, खासदार शशिकांत शिंदे यांचा विजय असो' अशा कार्यकर्त्यांनी दिलेल्या घोषणांनी सारा परिसर दणाणून गेला होता. मुंबई बाजार समितीत ज्यांनी चुकीचे काम केले ते कायद्यापेक्षा मोठे नसून, याचे आत्मपरीक्षण करूनच त्यांनी लोकांपुढे गेले पाहिजे असा सूचक इशारा खासदार उदयनराजेंनी शशिकांत शिंदेंचा नामोल्लेख टाळत केला होता. यासंदर्भात छेडले असता शिंदे म्हणाले, लोकसभेची संपूर्ण निवडणूक जनतेनेच हाती घेतल्याने कोणाचेही काहीही चालणार नाही आणि साताऱ्याच्या भूमीने कधीही जातीयरंग असलेल्या लोकांना थारा दिलेला नाही. आम्ही निष्ठा बदलली नाही आणि त्यातून होणाऱ्या परिणामांनाही घाबरत नाही. खोट्या गुन्ह्यातून आवाज दाबण्याचा प्रयत्न झाल्यास सत्य कधी मरत नसून, न्यायप्रविष्ट प्रकरणात सरकारने हस्तक्षेप करायची गरज नाही. आम्ही लोकांच्या न्यायालयमध्ये असून, निवडणुकीत कोणी असा दबाव आणत असल्यास ते योग्य नाही. महाराष्ट्रातील ४८ जागांसाठी जर पाच टप्प्यात निवडणूक होत असेलतर 'महायुती'ला पोषक वातावरण नाही. राज्यकर्त्यांविरोधात सर्वत्र लाट असल्याची टीका शिंदे यांनी केली. मी आव्हान कोणाला देत नाही. माझी लढाई कोणत्या उमेदवाराशी वा नावाशी नाही. नेत्यांना, पक्षांना फोडून सातारा जिल्ह्या काबीज करण्याचा प्रयत्न विरोधकांनी केला. पण, त्यास जनतेचा प्रतिसाद मिळला नसल्याचे शशिकांत शिंदे यांनी सांगितले. शरद पवार हे पंतप्रधान झाले असते मात्र, ज्यावेळी काँग्रेसमधून ते बाहेर पडले तेंव्हा एच. डी. देवेगौडांनी त्यांना बोलावलं होतं पण, पवारांनी ऐनवेळी कच खाल्ली अशी टीका प्रफुल्ल पटेल यांनी केल्याकडे लक्ष वेधले असता, शिंदे म्हणाले, पवारसाहेब कच खाणारे नव्हेतर डाव टाकणारे कणखर नेते आहेत. आताही त्यांनी महाराष्ट्राच्या अस्सल स्वाभिमानाचा डाव टाकला आहे त्यातून, 'महायुती'चे स्वप्न भंग पावणार असून, निवडणूक निकालातून हे दिसून येईल असा विश्वास शिंदेंनी दिला.

### सत्य कधी मरत नसते

» नरेंद्र पाटील भाजपात असलेतरी माथाडी कामगारांची नेहमी शरद पवारांशी बांधिलकी राहिली आहे. माझेही त्यांच्यासाठी काम असल्याने माथाडी कामगार 'महाविकास आघाडी'च्याच मागे उभा राहील असा ठाम विश्वास असल्याचे शिंदे यांनी सांगितले.शशिकांत शिंदे यांनी सर्वप्रथम काँग्रेस नेते, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या निवासस्थानी जाऊन पृथ्वीराज चव्हाणांचे पिताश्री, माजी केंद्रीय मंत्री डी. आर. तथा आनंदराव चव्हाण आणि काँग्रेसच्या माजी प्रदेशाध्यक्ष प्रेमालकाकी चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.शिंदेंनी ज्येष्ठ नेते पी. डी. पाटील यांच्या प्रतिमचे दर्शन घेवून अभिवादन केले. कराड शहरातील अनेक पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करुन त्यांनी अभिवादन जर कोणी दबावाचे राजकारण करीत असेल तर परिणामांना कधी घाबरलो नाही, खोट्या गुन्ह्यातून आवाज दाबण्याचा प्रयत्न झाल्यास सत्य कधी मरत नसते असा कणखर बाणा दाखवत, विरोधकांनीअशा प्रकारे रडीचा डाव खेळू नये अशी अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सातारा लोकसभा मतदार संघाचे उमेदवार, आमदार शशिकांत शिंदे यांनी व्यक्त केली.

---

# मला रोज फोन यायचे, साहेब त्यांना काहीतरी सांगा

## शिवतारेंच्या निवडणूक लढवण्याच्या भूमिकेवर शिंदेंनी सांगितला किस्सा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बारामती लोकसभेची निवडणूक लढवण्याची घोषणा विजय शिवतारे यांनी केली होती. मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर झालेल्या चर्चेनंतर विजय शिवतारे यांनी बारामतीच्या निवडणुकीमधून माघार घेतली. यानंतर (११ एप्रिल) सासवडमध्ये महायुतीचा जनसंवाद मेळावा पार पडला.**



या मेळाव्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विजय शिवतारे उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक किस्सा सांगितला. विजय शिवतारे यांनी बारामतीची निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला तेव्हा रोज फोन यायचे, साहेब त्यांना काहीतरी सांगा, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले."मी विजय शिवतारे यांचे मनापासून अभिनंदन करतो, त्यांना धन्यवाद देतो. सर्व ट्विवर विजय शिवतारे दिसायचे. त्यांनतर मला रोज फोन यायचे, साहेब त्यांना काहीतरी सांगा. आपण महायुती म्हणून निवडणूक लढवतोय. महायुतीमध्ये आपल्याला एक एक मतदारसंघ जिंकायचा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करायचे आहे. ही विकासाची लढाई आहे. या देशाला महासत्तेकडे घेऊन जाण्यासाठी नरेंद्र मोदी यांना आपल्याला तिसऱ्यांदा पंतप्रधान करायचे आहे.त्यामुळे मी विजय शिवतारे यांना सांगितले की, बापू आपण महायुतीत आहोत. मी मुख्यमंत्री आहे, माझे तुम्ही कार्यकर्ते, पदाधिकारी आहात. या निवडणुकीमध्ये आपल्याला महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांना निवडून द्यायचे आहे. तुमच्यामुळे या महायुतीला तढा जाईल आणि महायुतीचे नुकसान होईल, असे कुठलेही काम आपल्या हातातून होता कामा नये", असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

### दुस्मनी करतो तर मनापासून

» माझ्याकडे काही लोकही आले होते. त्यांना निवडणुकीला उभे राहूद्या म्हणून सांगत होते. यानंतर विजय शिवतारे यांनीही सांगितले की, मी बारामती लोकसभा मतदारसंघामधून का निवडणूक लढवली पाहिजे. ते म्हणाले, या मतदारसंघाचे कामे झाले पाहिजेत. यानंतर यासंदर्भातील एक पत्रक त्यांनी आम्हाला दिले."यानंतर ते म्हणाले माझ्याबाबत लोकांमध्ये कोणताही संभ्रम निर्माण होऊ नये, कारण विजय शिवतारे यांनी एकदा निर्णय घेतला आणि नंतर तो निर्णय मागे घेतला तर आरोप-प्रत्यारोप होतील. त्यामुळे तुम्ही येऊन जनतेसमोर संवाद साधा, असे वियज शिवतारे यांनी मला सांगितले, त्यामुळे आज येथे आलो आहे. विजय शिवतारे यांनी सांगितले की, मी निवडणूक लढण्याचा आग्रह केला, जनतेसाठी भांडलो, मी ट्विवर मुलाखती दिल्या. पण मी दुस्मनी करतो तर मनापासून आणि मैत्री करतो तर मनापासून असे शिवतारे यांनी मला सांगितले.

# केजरीवालांचे वजन घटले नाही

## 1 किलो वाढले? भाजपा नेत्याच्या दाव्याने चर्चांना उधाण!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अरविंद केजरीवाल यांना अटक झाल्यानंतर त्यांचे वजन घटले नाही, तर उलट १ किलोनी वाढले, असा दावा दिल्लीतील भाजपाचे विरोधी पक्षनेते रामवीर सिंह बिधुरी यांनी केला आहे. बुधवारी माध्यमांशी बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. महत्त्वाचे म्हणजे भाजपा नेत्याच्या दाव्यानंतर आता विविध राजकीय चर्चांनाही उधाण आलं आहे**

‘द इकॉनॉमिक्स टाईम्स’ने दिलेल्या वृत्तानुसार, दिल्लीतील भाजपाचे विरोधी पक्षनेते रामवीर सिंह बिधुरी यांनी केजरीवाल यांचे वाढले असल्याचे म्हटले आहे. तसेच केजरीवाल यांच्या रक्तातील साखरेची पातळी आणि रक्तदाबही सामान्य असल्याचा दावा बिधुरी यांनी केला आहे. ”अटक झाल्यानंतर चार दिवसांत अरविंद केजरीवाल यांचे वजन ४.५ किलोने कमी झाल्याचे आदमी पक्षाने म्हटले आहे. मात्र, अधिकृत माहितीनुसार, त्यांचे वजन कमी झाले नसून उलट १ किलोनी वाढले आहे”, असे ते म्हणाले.अरविंद केजरीवाल यांनी आठवड्यातून पाच वेळा त्यांच्या वकीलांना भेटण्याची परवानगी मागितली आहे. मात्र, त्यांना न्यायालयाने केवळ दोन वेळाच भेटण्याची परवानगी दिली आहे. सामान्य व्यक्ती असो किंवा व्हीआयपी, नियम सर्वांसाठी सारखे आहे. असेही ते म्हणाले.दोन दिवसांपूर्वी आम आदमी पक्षाच्या नेत्या आतिशी यांनी अरविंद केजरीवाल यांचे वजन ४.५ किलोनी घटल्याचा दावा केला होता. अरविंद केजरीवाल यांना मधुमेहाची गंभीर समस्या आहे. परंतु, त्यांनी कधी त्यांच्या आरोग्याच्या समस्यांना



देशसेवेमध्ये अडथळा बनू दिलं नाही. भाजपा सरकारने त्यांना अटक केल्यापासून त्यांची प्रकृती ढासळली आहे. ईडीच्या कोठडीत असल्यापासून आतापर्यंत त्यांच्या रक्तातील साखरेची पातळी तीन वेळा घसरली आहे. अटकेपासून १२ दिवसांत त्यांचं वजन ४.५ किलोने घटलं आहे. मधुमेहग्रस्त व्यक्तीचं वजन अशा पद्धतीने इतक्या वेगाने घसरणं खूप गंभीर बाब मानली जाते. त्यांच्यासमोर अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात, असे त्या म्हणाल्या होत्या.दरम्यान, आम आदमी पक्षाच्या दाव्यानंतर तिहार जेलच्या अधिकाऱ्यांनी अरविंद केजरीवाल यांचे वजन कमी झाले नसल्याचे स्पष्ट केले. तसेच न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांना रोज घरचे जेवण दिले जात असल्याचेही अधिकाऱ्यांनी म्हटले होते.अरविंद केजरीवाल यांना दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी २१ मार्च रोजी ईडीकडून अटक करण्यात आली होती. तसेच दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने त्यांची कोठडीत रवानगी केली होती. त्यानंतर ईडीने केलेली कारवाई ही बेकायदेशीर असून कोठडीतून सुटका करण्यात यावी, अशी मागणी याचिकेद्वारे अरविंद केजरीवाल यांच्या वकिलांनी उच्च न्यायालयात केली. मात्र, ही याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळून लावली होती.

### वजन 4.5 किलोनी घटल्याचा दावा

» ‘द इकॉनॉमिक्स टाईम्स’ने दिलेल्या वृत्तानुसार, दिल्लीतील भाजपाचे विरोधी पक्षनेते रामवीर सिंह बिधुरी यांनी केजरीवाल यांचे वाढले असल्याचे म्हटले आहे. तसेच केजरीवाल यांच्या रक्तातील साखरेची पातळी आणि रक्तदाबही सामान्य असल्याचा दावा बिधुरी यांनी केला आहे. ”अटक झाल्यानंतर चार दिवसांत अरविंद केजरीवाल यांचे वजन ४.५ किलोने कमी झाल्याचे आदमी पक्षाने म्हटले आहे. मात्र, अधिकृत माहितीनुसार, त्यांचे वजन कमी झाले नसून उलट १ किलोनी वाढले आहे”, असे ते म्हणाले.अरविंद केजरीवाल यांनी आठवड्यातून पाच वेळा त्यांच्या वकीलांना भेटण्याची परवानगी मागितली आहे. मात्र, त्यांना न्यायालयाने केवळ दोन वेळाच भेटण्याची परवानगी दिली आहे. सामान्य व्यक्ती असो किंवा व्हीआयपी, नियम सर्वांसाठी सारखे आहे. असेही ते म्हणाले.दोन दिवसांपूर्वी आम आदमी पक्षाच्या नेत्या आतिशी यांनी अरविंद केजरीवाल यांचे वजन ४.५ किलोनी घटल्याचा दावा केला होता. अरविंद केजरीवाल यांना मधुमेहाची गंभीर समस्या आहे. परंतु, त्यांनी कधी त्यांच्या आरोग्याच्या समस्यांना देशसेवेमध्ये अडथळा बनू दिलं नाही. भाजपा सरकारने त्यांना अटक केल्यापासून त्यांची प्रकृती ढासळली आहे.

# बौद्ध हा वेगळा धर्म, हिंदूंनी धर्मांतरासाठी संमती घेणं अनिवार्य!

## गुजरात सरकारने 8 एप्रिलला काढलेलं परिपत्रक चर्चेत

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बौद्ध धर्म हा वेगळा धर्म मानला गेला पाहिजे. हिंदू धर्मातून बौद्ध, जैन, शीख किंवा अन्य कुठल्याही धर्मात धर्मांतर करायचं असेल तर जिल्हाधिकाऱ्यांची तशी संमती घेणं गरजेचं आहे. गुजरात धर्म स्वातंत्र्य कायद्यातील २००३ च्या तरतुदी प्रमाणे ते सक्तीचं आहे असं म्हटलं आहे. गुजरात सरकारने यासंदर्भात काढलेलं परिपत्रक चर्चेत आलं आहे.**



बौद्ध धर्म स्वीकारणाऱ्या अर्जांवर नियमाप्रमाणे कार्यवाही होत नाही ही बाब लक्षात आल्यानंतर गुजरात सरकारने ८ एप्रिल रोजी हे परिपत्रक काढलं आहे. बौद्ध धर्म हा स्वतंत्र धर्म असून धर्मांतरासाठी आधी जिल्हाधिकाऱ्यांची संमती आवश्यक असल्याची बाब यात नमूद करण्यात आली आहे. गुजरात राज्याच्या गृह विभागाचे उपसचिव विजय बधेका यांच्या स्वाक्षरीने हे पत्रक काढण्यात आलं आहे. गुजरातमध्ये दसऱ्याच्या दिवशी आणि इतर महत्त्वाच्या सणांच्या दिवशी दलित बांधव हे बौद्ध धर्म स्वीकारतात. त्या अनुषंगाने हे पत्रक काढण्यात आलं आहे. गुजरात सरकारने जे परिपत्रक काढलं आहे त्यात ही बाबही नमूद करण्यात आली आहे की गुजरात मधली जिल्हाधिकारी कार्यालयं गुजरात धर्म स्वातंत्र्य कायद्याचा अर्थ त्यांना हवा तसा घेत आहेत. हिंदू धर्मातून बौद्ध धर्मात परिवर्तन करण्याची संमती मागणाऱ्या अर्जांवर अपेक्षित कार्यवाही होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. तसंच काहीवेळा असंही निदर्शनास आलं आहे की अर्जदार स्वायत्त संस्थांकडून असे निवेदन आणतात की हिंदू धर्मातून बौद्ध धर्मात परिवर्तन करण्यासाठी पूर्व संमती आवश्यक नाही. मात्र ही बाब तशी नाही. बौद्ध हा वेगळा धर्म आहे. या धर्मात परिवर्तन करायचं असेल तर संमती घेणं अनिवार्य आहे असं आता गुजरात सरकारने स्पष्ट केलं आहे.गुजरात सरकारच्या परिपत्रकात ही बाब प्रकर्षाने नमूद करण्यात आली आहे की गुजरात धर्म स्वातंत्र्य कायद्यान्वये बौद्ध धर्म हा स्वतंत्र धर्म आहे. या कायद्यानुसार हिंदू धर्मातून बौद्ध, शीख, जैन किंवा कुठल्याही धर्मात धर्मांतर करायचे असेल तर जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल. गुजरातच्या गृहविभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने इंडियन एक्स्प्रेसला हे सांगितलं, “काही जिल्हाधिकारी हे हिंदू धर्मातून बौद्ध धर्मात धर्मांतर करण्यासंदर्भातल्या अर्जावर निर्णय घेताना चुकीचा पायंडा पाडत आहेत. नियमांचा चुकीचा अर्थ लावला जातो आहे ही बाब निदर्शनास आल्यानेच गुजरात सरकारने हे पत्रक काढले आहे. आम्ही काही जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत विचारणा केली होती. त्यांच्याकडून जी उत्तरं आम्हाला मिळाली त्यानंतर आम्ही हे पत्रक काढलं आहे.”गुजरातमध्ये बौद्ध धर्म स्वीकारलं जाणं मोठ्या प्रमाणावर होतं. गुजरात बुद्धिस्ट अकादमी या संस्थेतर्फे धर्मांतर कार्यक्रम आयोजित केले जातात. याच अकादमीचे सचिव रमेश बनकर यांनी या परिपत्रकाचं स्वागत केलं आहे. कायद्याचा चुकीचा अर्थ आत्तापर्यंत लावला जात होता. सरकारच्या परिपत्रकामुळे हे स्पष्ट झालं आहे की बौद्ध हा वेगळा धर्म आहे आणि त्याचा हिंदू धर्माशी संबंध नाही. प्रशासनातल्या काही जणांनी संभ्रमाचं वातावरण निर्माण केलं होतं ते या पत्रकामुळे दूर झालं आहे असं बनकर यांनी म्हटलं आहे.

### बौद्ध धर्म हा स्वतंत्र धर्म

» बौद्ध धर्म स्वीकारणाऱ्या अर्जांवर नियमाप्रमाणे कार्यवाही होत नाही ही बाब लक्षात आल्यानंतर गुजरात सरकारने ८ एप्रिल रोजी हे परिपत्रक काढलं आहे. बौद्ध धर्म हा स्वतंत्र धर्म असून धर्मांतरासाठी आधी जिल्हाधिकाऱ्यांची संमती आवश्यक असल्याची बाब यात नमूद करण्यात आली आहे. गुजरात राज्याच्या गृह विभागाचे उपसचिव विजय बधेका यांच्या स्वाक्षरीने हे पत्रक काढण्यात आलं आहे. गुजरातमध्ये दसऱ्याच्या दिवशी आणि इतर महत्त्वाच्या सणांच्या दिवशी दलित बांधव हे बौद्ध धर्म स्वीकारतात. त्या अनुषंगाने हे पत्रक काढण्यात आलं आहे.

# भाईजानने खास अंदाजात दिल्या ईदच्या शुभेच्छा

सालाबादप्रमाणे यंदाही ईद निमित्ताने सलमान खानच्या घराबाहेर चाहत्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. ईदच्या दिवशी भाईजानची एक झलक पाहण्यासाठी त्याच्या वांद्रे येथील 'गॅलेक्सी' घराबाहेर आज दिवसभरापासून चाहते आतुरतेने वाट पाहत होते. यादरम्यान चेंगराचेंगरी व पोलिसांचा लाठीचार्ज झाला. तरी देखील चाहते भाईजानची एक झलक पाहण्यासाठी घराबाहेर थांबले होते. अखेर सलमान खानची झलक चाहत्यांना झाली आहे. याचे अनेक व्हिडिओ सध्या सोशल मीडियाच्या माध्यमातून समोर आले आहेत. शिवाय सलमानच्या सोशल मीडिया अकाउंटवर व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे."ईद




मुबारक", असं कॅप्शन लिहित सलमान खानच्या इन्स्टाग्रामवर नुकताच व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत, चाहत्यांना बाल्कनीतून सलमान खान ईदच्या शुभेच्छा देताना दिसत आहे. यावेळी सलमानचे वडील सलीम खान देखील पाहायला मिळत आहेत.कधी हात जोडून, कधी हात उंचावून चाहत्यांना सलमान खान ईदच्या शुभेच्छा देताना दिसत आहे. भाईजानची झलक पाहून चाहते एकच आवाज करताना पाहायला मिळत आहे.

दरम्यान, आज ईदचं औचित्य साधून खासदार श्रीकांत शिंदे यांनी सलमान खानची भेट घेऊन त्याला शुभेच्छा दिल्या. या भेटीचे बरेच फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. एवढंच नाही तर ईदनिमित्ताने सलमानने आपल्या नव्या चित्रपटाची घोषणा देखील केली. 'सिकंदर' असं चित्रपटाचं नाव आहे.

## आमिरने साजरी केली ईद

आज संपूर्ण देशभरात ईद जल्लोषात साजरी केली जात आहे. यानिमित्ताने बॉलीवूड सेलिब्रिटी आपल्या चाहत्यांना ईदच्या शुभेच्छा देताना दिसत आहेत. आमिर खान आपल्या कुटुंबासह ईद साजरी करताना दिसला. याचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. सेलिब्रिटी फोटोग्राफर 'विरल भयानी'च्या इन्स्टाग्राम पेजवर आमिर खानचे व्हिडीओ शेअर करण्यात आले आहेत. यामध्ये आमिर जुनैद व आजाद या दोन्ही मुलांबरोबर दिसत आहे. यावेळी तिघं देखील पांढऱ्या रंगाच्या कपड्यांमध्ये पाहायला मिळत आहेत. या व्हिडीओत, आमिर पापाराझींना मिठाई वाटताना दिसत आहे. तसंच पापाराझी अभिनेत्याला मिठाई भरवत आहे. एवढंच नाहीतर आमिर, जुनैद, आजाद देखील काही पापाराझींना मिठाई भरवताना पाहायला मिळत आहे.या व्हिडीओमध्ये, आमिर खानची चाहती त्याच्याबरोबर फोटो काढण्यासाठी उत्सुक दिसत आहे. भर गर्दीतून ती पुढे येऊन अभिनेत्याला फोटोसाठी विचारते. यावेळी ती म्हणते, "मी खूप लांबून आली आहे." हे ऐकून अभिनेता तिच्याबरोबर फोटो काढतो. आमिर खानचे ईद साजरे करतानाचे असे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.दरम्यान, आमिरच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, 'लापता लेडीज'नंतर तो लवकरच 'लाहौर १९४७' या चित्रपटाची निर्मिती करणार असल्याचं म्हटलं जात आहे. या चित्रपटात सनी देओल प्रमुख भूमिकेत असण्याची शक्यता आहे. याशिवाय प्रीती झिंटा, शबाना आजमी, करण देओल आणि अली फजल हे देखील या चित्रपटात असू शकतात.



## शाहरुखचे 'जबरा फॅन्स'!

शाहरुख खानची एक झलक पाहण्यासाठी त्याचे लाखो चाहते उत्सुक असतात. वाढदिवस आणि ईद साजरी करण्यासाठी दरवर्षी किंग खान मन्नतबाहेर येतो. गेल्या अनेक वर्षांपासून घराच्या बाल्कनीत येऊन अभिनेता त्याच्या तमाम चाहत्यांना ईद मुबारक म्हणत शुभेच्छा देतो. दरवर्षीप्रमाणे यंहादी शाहरुखने लेक अबरामसह मन्नतवरून त्याच्या सगळ्या चाहत्यांची भेट घेतली. शाहरुखला पाहण्यासाठी आजूबाजूच्या परिसरात मोठी गर्दी झाली होती. संपूर्ण जगभरात आज ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत आहे. ईदनिमित्त बॉलीवूडचा सुपरस्टार शाहरुख खान देखील दरवर्षी मन्नवरून चाहत्यांना अभिवादन करतो. किंग खानने त्याच्या इन्स्टाग्रामवर खास व्हिडीओ शेअर करत जे चाहते आज मन्नतवर उपस्थित राहू शकले नाहीत अशा सगळ्यांना ईद मुबारक म्हणत शुभेच्छा दिल्या आहेत. याशिवाय गर्दी करणाऱ्या तमाम फॅन्सचे त्याने आभार मानले आहेत.शाहरुखने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये मन्नतबाहेर म्हणजेच संपूर्ण बॅण्डस्टॅण्डच्या परिसरात त्याच्या हजारो चाहत्यांनी तोबा गर्दी केल्याचं पाहायला मिळत आहे. यावेळी किंग खानने हात उंचावून त्याच्या सगळ्या चाहत्यांना शुभेच्छा दिल्या. याचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहेत.शाहरुखबरोबर त्याचा लाडका लेक अबराम देखील उपस्थित होता. या व्हिडीओमध्ये अबरामदेखील सर्वांना शुभेच्छा देत असल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. शाहरुखने त्याचं स्टारडम एका वेगळ्या पद्धतीने जपलंय असं अनेक युजर्सनी म्हटलं आहे. शाहरुख खानची एक झलक पाहण्यासाठी त्याचे लाखो चाहते उत्सुक असतात.



## निरागस पतीला का फसवलंस : समांथाचं उत्तर

दाक्षिणात्य अभिनेत्री समांथा रुथ प्रभूला उ आंटावा गाण्यामुळे घराघरांत ओळख मिळाली. त्याआधी ती दक्षिणेत सुपरहिट होतीच. तिच्या खासगी आयुष्याचीही चर्चा सोशल मीडियावर रंगली होती. सर्वात महत्त्वाचं कारण होतं ते म्हणजे नागा-चैतन्य आणि तिचा घटस्फोट. २०२१ मध्ये हे दोघंही वेगळे झाले. तिच्या खासगी आयुष्यातला हा निर्णय. ज्यानंतर समांथाला मायोसिटीस आजाराचंही निदान झालं. त्यामुळे तिने कामातूनही काही महिने ब्रेक घेतला होता. समांथा घटस्फोटाच्या वृत्तामुळे ट्रोल झाली होती. अजूनही तिला ट्रोल केलं जातं आहे. समांथाने एक पॉडकास्ट सुरु केला आहे, जो आरोग्याशी संबंधित आहे. या पॉडकास्टच्या कमेंट बॉक्समध्ये एका युजरने तिला नागा चैतन्यसारख्या निरागस माणसाला का सोडून दिलंस? असा खोचक प्रश्न विचारला होता. त्यावर समांथाने रोखठोक उत्तर देत या युजरला खडे बोल सुनावले. समांथाचं हे उत्तर चर्चेत आहे.समांथा आरोग्याशी संबंधित तिच्या पॉडकास्टमध्ये मॉर्निंग रुटीनबाबत बोलत होती. ती सकाळी झोपेतून उठल्यापासून काय करते हे सांगत होती. हा पॉडकास्ट पूर्णपणे आरोग्याशी संबंधित आहे तरीही तिला एका युजरने प्रश्न विचारला, मला सांग तू तुझ्या निरागस पतीला का फसवलंस? असा प्रश्न युजरने केला.

# मुंबईनं केली आरसीबीची धुळधाण!

## बुमराहचा फायफर, ईशान- सूर्याच्या धडाक्यापुढे बंगळुरु गारद

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**मुंबई इंडियन्सने अवघ्या १५.३ षटकांत आरसीबीवर ७ विकेट्सने मोठा विजय नोंदवला आहे. आरसीबीने दिलेल्या १९७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इशान किशन, रोहित शर्मा आणि विस्फोटक फलंदाज सूर्यकुमार यादवच्या तुफान फटकेबाजीच्या जोरावर मुंबईने हा शानदार विजय मिळवला आहे. सूर्याने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला येत ताबडतोब फलंदाजी करत अवघ्या १९ चेंडूत ५२ धावा केल्या. मुंबईच्या फलंदाजीची सुरुवात खूपच चांगली झाली आणि इशान किशनने चौकार-षटकारांच्या आतिषबाजीसह मुंबईच्या विजयाचा पाया रचला. तर गोलंदाजीमध्ये जसप्रीत बुमराहने ५ विकेट्स घेत आरसीबीला लागोपाठ धक्के दिले.**



इशान किशनने सलामीला येत दुसऱ्याच षटकात षटकार लगावत फटकेबाजीला सुरुवात केली आणि नंतर वादळी खेळी केली. इशानने ३४ चेंडूत ५ षटकार आणि ७ चौकारांसह ६९ धावा केल्या आहेत. तर रोहित शर्माने संधी मिळताच फटके लगावले. रोहितने २४ चेंडूत ३ षटकार आणि ३ चौकारांच्या जोरावर ३८ धावा केल्या. इशान बाद झाल्यानंतर आलेल्या सूर्याने वानखेडेवरील प्रेक्षकांसाठी चौकार-षटकारांसाठी खास आतिषबाजी केली. ३ महिन्यांनंतर आलेल्या सूर्याने आपला फॉर्म दाखवून देत अवघ्या १९ चेंडूत ४ षटकार आणि ५ चौकारांसह ५२ धावा केल्या. यानंतर हार्दिकनेही शानदार खेळी करत ६ चेंडूत ३ षटकारांसह २१ धावा केल्या आणि विजयी षटकाराने संघाला विजय मिळवून दिला.आरसीबीने आयपीएलमधील सलग चौथा पराभव नोंदवला आहे. पुन्हा एकदा संघाच्या गोलंदाजांनी निराश केले आहे. १० षटके आणि १०० धावांचा टप्पा मुंबईने गाठल्यानंतर संघाला पहिली विकेट मिळवण्यात यश आले. पॉवरप्लेमध्ये इशानने सर्वच गोलंदाजांची धुलाई केली. सिराजही आजच्या सामन्यात एकही विकेट घेऊ शकला नाही. आकाशदीप, विजयकुमार आणि विल जॅक्स यांना प्रत्येकी एक विकेट मिळवता आली. पण तोवर सामना संघाच्या हातातून निसटला होता. प्रत्येक गोलंदाजाचा इकोनॉमी रेट हा या सामन्यात १०च्या वर होती.नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने चांगली सुरुवात केली. मुंबईचा दमदार गोलंदाज बुमराहने तिसऱ्या षटकात विराट कोहलीला इशान किशनकरवी विकेटच्या मागे झेलबाद केले. विराट कोहली अवघ्या ३ धावांवर बाद झाला. यानंतर विल जॅकने ८ धावांवर विकेट गमावली. त्यानंतर आलेल्या रजत पाटीदारने शानदार खेळी करत संघाचा डाव सावरला. त्याने २६ चेंडूत ५० धावा केल्या. दुसऱ्या टोकाला असलेल्या कर्णधार फाफ डू प्लेसिसने ४१ चेंडूत ६१ धावा करत संयमी फलंदाजी केली. मात्र, ग्लेन ग्लेन मॅक्सवेलने पुन्हा एकदा निराश केले आणि तो खाते न उघडताच बाद झाला. मॅक्सवेलला श्रेयस गोपालने एलबीडब्ल्यू केले. यानंतर आलेल्या फलंदाजांना बुमराहने माघारी धाडले. पण २३ चेंडूत ५३ धावांची नाबाद खेळी करत कार्तिकने संघाची धावसंख्या १९६ धावांवर नेली. कार्तिकने आपल्या खेळीत ५ चौकार आणि ४ शानदार षटकार मारले.

### किशनने विजयाचा पाया रचला

» मुंबईकडून बुमराहने ५, कोएत्झी,आकाश मधवाल आणि श्रेयस गोपाल यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.मुंबई इंडियन्सने अवघ्या १५.३ षटकांत आरसीबीवर ७ विकेट्सने मोठा विजय नोंदवला आहे. आरसीबीने दिलेल्या १९७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इशान किशन, रोहित शर्मा आणि विस्फोटक फलंदाज सूर्यकुमार यादवच्या तुफान फटकेबाजीच्या जोरावर मुंबईने हा शानदार विजय मिळवला आहे. सूर्याने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला येत ताबडतोब फलंदाजी करत अवघ्या १९ चेंडूत ५२ धावा केल्या. मुंबईच्या फलंदाजीची सुरुवात खूपच चांगली झाली आणि इशान किशनने चौकार-षटकारांच्या आतिषबाजीसह मुंबईच्या विजयाचा पाया रचला.

# गौतम गंभीरच्या गळाभेटीवर विराटने सोडले मौन!

## कोहलीने गौतम गंभीरचे नाव घेतल्यावर चाहत्यांनी जल्लोष केला

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आयपीएल २०२३ च्या एलएसजी विरुद्ध आरसीबी सामान्यादरम्यान किंग कोहली आणि नवीन उल हक यांच्यात जोरदार वादावादी झाली होती. हा वाद इतका वाढला होता की तत्कालीन प्रशिक्षक गौतम गंभीर यांनीही त्यात उडी घेतली आणि दोघांमध्ये तणाव निर्माण झाला. मात्र, तिघांमधील वाद आयपीएलच्या १७ व्या हंगामात संपुष्टात आला. कोलकाता विरुद्ध आरसीबी सामन्यात विराटने गौतमला मिठी मारून मैत्रीचा हात पुढे केला, तर गौतम गंभीरने स्टार फलंदाजाला मिठी मारली. आता आरसीबीच्या दिग्गज फलंदाजाने यावर मौन सोडले आहे. ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.**



एशियन पेंट इव्हेंटदरम्यान विराट कोहलीने जुना किस्सा सांगताना गौतम गंभीरचे नाव घेताच चाहत्यांनी जल्लोष सुरू केला. त्यानंतर विराट शांत झाला आणि म्हणाला, "लोक खूप निराश झाले आहेत, कारण त्या दिवशी मी नवीनला मिठी मारली आणि मग गौती भाई आले आणि मला मिठी मारली. तुमचा (चाहत्यांचा) मसाला संपला म्हणून तुम्ही ओरडत आहात. आम्ही काय लहान मुलं आहोत का?" या घटनेचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.आयपीएल २०२३ मध्ये विराट कोहली आणि गौतम गंभीर यांच्यात शाब्दिक युद्ध रंगले होते. नवीन उल हक हा या वादाचा केंद्रबिंदू ठरला. पण २०२३ च्या विश्वचषकात भारतीय संघ अफगाणिस्तानशी भिडला तेव्हा चाहत्यांनी नवीनला ट्रोल करायला सुरुवात केली. पण विराटने नवीनला मिठी मारून हा मुद्दा संपवला. त्याचवेळी विराटच्या चाहत्यांनी गंभीरवरही निशाणा साधला होता. मात्र आयपीएळ २०२४ मध्ये केकेआर आणि आरसीबी यांच्यातील सामन्यात दोघांनी एकमेकांनी मिठी मारली. त्यानंतर या दोघांमधील वाद सपला असल्याचे स्पष्ट झाले. या कार्यक्रमादरम्यान विराट कोहलीने टीम इंडियाच्या 'सीता-गीता'बद्दलही खुलासा केला. विराटने त्या दोन खेळाडूंची नावे सांगितली जे एकमेकांशिवाय क्षणभरही राहू शकत नाहीत. शुबमन गिल आणि इशान किशन हे भारतीय संघाची 'सीता-गीता' म्हणून टॅग केले. तो म्हणाला, "सीता आणि गीता (इशान आणि शुबमन) खूप मजेदार आहेत. मलाही कळत नाही की काय होत आहे. जास्त सांगू शकत नाही पण हे लोक दौऱ्यात एकटे राहू शकत नाहीत. जर आम्ही जेवायला बाहेर गेलो, तरी हे दोघे सोबत येतात. चर्चेदरम्यानही ते नेहमी एकत्र असतात.

### लोक एकटे राहू शकत नाहीत

» ."सध्या विराट आयपीएल २०२४ मध्ये खेळताना दिसत आहे. तो ऑरेंज कॅपच्या शर्यतीत ३१६ धावांसह अव्वल आहे.आयपीएल २०२३ च्या एलएसजी विरुद्ध आरसीबी सामान्यादरम्यान किंग कोहली आणि नवीन उल हक यांच्यात जोरदार वादावादी झाली होती. हा वाद इतका वाढला होता की तत्कालीन प्रशिक्षक गौतम गंभीर यांनीही त्यात उडी घेतली आणि दोघांमध्ये तणाव निर्माण झाला. मात्र, तिघांमधील वाद आयपीएलच्या १७ व्या हंगामात संपुष्टात आला.